IMPACT FACTOR 5.473(SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL

Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal

Special Issue : Volume -9 : Issue-1 (March-2023)

ISSN 2455-4375

# महात्मा ज्योतिबा फुले यांचा विज्ञानवादी दृष्टीकोण

**प्रा.संजय उत्तमराव उगेमुगे**

चिंतामणी महाविद्यालय पोंभूर्णा,

पोष्ट,ता,पोभूर्णा जिल्हा चंद्रपूर

मों.नं – 9623555612

Email Id - sanjayugemuge80@gmail.com

---

***सारांश :–***

*ज्या काळातकर्मठ लोकांनी सर्वसामान्य जनतेला आपल्या हातीशी घेउन त्यांचे शोषण करायला लागले तेव्हा.तेव्हा सर्वसामान्य जनता अज्ञान अंधश्रद्धा यांच्या जाळमटात खितपत पडलेला होता. अशा समाजाच्या अंधकार दुर करण्यासाठी, आणि त्यांचा उद्धार करण्यासाठी क्रांतीच्या सुर्य घेवून महात्मा ज्योतिबा फुले आले. त्यांनी महाराष्ट्रातील समाज सुधारणेच्याव समाजपरीवर्तनाचा विडा उचलला, त्यामुळे महाराष्ट्रातील जनता त्यांना क्रांतिचे अग्रदुत म्हणून संबोधतात तशीच यांची ओळख सर्वत्र आहे. महात्मा ज्योतिबा फुले हे महाराष्ट्रातील असामान्य व्यतिमत्व म्हणून सर्वत्र परीचित आहे. त्यांनी समाजपरीर्वतन घडून आणण्याचा मनाशी गाठ बांधली. त्यांच्या प्रयत्नाला फार मोठे यश आले. त्यातून मोठया प्रमाणात, समाजात प्रबोधन घडून आले.तथाकथित समाजाला कर्मकांडाच्या जंजाळयातून मुक्त करण्यासाठी त्यांनी क्रांतीचे शस्त्र उपसले, त्यांना कळून चुकले की अज्ञान हे मुळ कारण आहे ते मिटविल्या शिवाय क्रांती घडुन येणार नाही,व मरणाऱ्या मानसाच्या डोक्यावरील लोणी खाने बंद होईल. यासाठी जनतेला सज्ञान केल्याशिवाय पर्याय नाही, ज्ञानाचा प्रकाश घेवून या अज्ञानरूपी अंधकाराचा विनाश झाल्याशिवाय राहणार नाही.यासाठी लोकांना सुक्षिशित करण्याचा निरर्धार केला.*

*विद्येविना मती गेली।*

*मतीविना निती गेली।*

*नितीविना गती गेली*

*गतीविना वित्त गेले।*

*वित्ताविना शुद्र खचले।*

*इतके अनर्थ एका अविद्येने केले।यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला जर स्त्री शिकली तर संपूर्ण कुंटूब सुक्षिशित होईल, असे मत महात्मा ज्योतिबा फुले यांनी मांडले त्यासाठी त्यांनी वर्ग चौथी पर्यतचे शिक्षण हे सक्तीचे व मोफत मिळावे यासाठी इंग्रज*

*सरकारपुढे अट्टाहास केला होता.*

***बिज संज्ञा*** *: – महात्मा ज्योतिबा फुले यांचा विज्ञानवादी दृष्टीकोण त्यांच्या क्रांतीकारी विचारतून व आचरणातून स्पष्ट करणे.*

---

**उद्देश : –**

- आपलेक्रांतीकारी विचार जनतेपर्यत पोहचविणे
- आपल्या आचरणातून आधुनिक विचार लोकांनासांगणे
- लोकांना कर्मकांडातून मुक्त करून त्यांचा विकास घडवून आणने
- तथाकथित समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा व अंधश्रद्धा नष्ट करणे.
- लोकांना सज्ञान करण्यासाठी शिक्षण देणे.
- आपले आचरण व विचार शुद्ध ठेवून ते लोकांना साध्या सरळ सोप्या भाषेत सांगणे.
- अनिष्ट रूढी प्रथा पंरपरेवर घनघाती हल्ला करूण त्याचे फायदे व तोटे लोकांना समजावून सांगणे.
- त्यांनी आपले विचार व क्रांती ही विज्ञानावरच आधारीत असली पाहिजे याची काळजी त्यांनी घेतलेली होती.
- सुधारणेची सुरवात त्यांना आपल्या घरातुनच करायची होती.
- जातीभेद मिटविण्यासाठी त्यांनी स्वतःच्या घरच्या पाण्याच्या हौद जनतेसाठी खुला करणे.
- कर्मकांड विरहीत समाजाची निर्मिती करणे.

**महात्मा ज्योतिबा फुले यांचा विज्ञानवादी दृष्टीकोण :–**

महात्मा ज्योतिबा फुले यांचे संपूर्ण विचार हे विज्ञानवादावर आधारीत आहे. त्यामुळे त्यांच्या विचारामुळे तथाकथित समाजात हलचल निर्माण झाली होती. त्यांनी सनातनी आणि कर्मठ विचाराला मुठमाती दिली. त्यांच्या ब्राम्हण्यवादी तत्वज्ञानावर आगपाखड करायला सुरवात केली. त्यामुळे पुण्यातील ब्राम्हण समाज चांगलाच खळवळलेला होता. त्यांना जिवे मारण्याचा अनेदा प्रयत्न करण्यात आले होते. तरी तसू भरही न डगमगता त्यांनी समाजसुधारणेचे व्रत जारी ठेवले.

त्यांनी जनतेला कर्मकांड्याच्या जंजाळयातून मुक्त करण्यासाठी शिक्षण किती आवश्यक आहे.याची जाणिव करून दिली. तशी मागणी इंग्रज सरकारला महात्मा ज्योतिबा फुले यांनी केली. तसे करायला भाग पाडले .त्यामुळे सामाजात फार मोठे परीवर्तन घडून आले.जनतेला चांगल्या वाईटाची संकल्पना कळायला लागली. त्यांचा ज्ञानाच्या कक्षा

वृदांवल्या आता ते उच्चवर्गीयांन सोबत वाद विवाद करू लागले. त्यातून त्यांनी समाजातील वाईट अनिष्ट चालीरिती नष्ट करायला भाग पडले.समाजाला सुजान करण्यात महात्मा ज्योतिबा फुले यशस्वी झाले. त्यामुळे आतापर्यंत कर्मकांड करीत असलेल्या समाजात जागृती निर्माण होऊन प्रथा, परपरा, अंधश्रद्धा हळूहळूनष्ट व्हायला सुरवात झाली..महात्मा ज्योतिबा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला त्यांतदेवीदेवतेला त्यांनी मान्यता दिली नाही. तर त्याला निर्मिक असे म्हटले. त्यांचे उपास तापास न करता. त्यांना नैवेद न दाखविता त्याचे फक्त आभार मानायला पाहीजे. असे परखड मत मांडले.

काही सनातनी कर्मठ लोकांनी स्वत:च्या हितासाठी वेगवेगळ्या देवादिकांची निर्मिती करून त्याच्यावर आपले पोट भरणे सुरू केले. त्यांच्या मनामध्ये देवादिकांची भिती निर्माण केली. त्या भितिच्या आधारे भोळया भाबडया जनतेला त्यांनी लुबाडणे सुरू केले. त्यामुळे सर्व सामान्य जनतेचे मोठ्या प्रमाणात शोषण व्हायला सुरवात झाली..अशाप्रकारच्या पाखंडी समाजाचा त्यानी विरोध करायला सुरवात केली.कोणताही धर्म अथवा कोणताही ग्रंथ हा ईश्वर निर्मित नाही, तो मानवनिर्मितच आहे असे परखड मत महात्मा ज्योतिबा फुले यांना मांडले. त्यांच्या या मताला तथाकथित ब्राम्हण वर्गानी तिव्र विरोध केला. त्याच्या परीणाम महात्मा ज्योतिबा फुले यांना, लोकांच्या बहिष्काराला सामोरे जावे लागले. तरीही त्याला न जुमानता आपले कार्य चालू ठेवले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी जनतेला ठणकावूण सागितले की, चातुवर्ण आणि जातिभेद हे मानवाने आपल्या फायद्यासाठी निर्माण केले आहे. त्याद्वारे दिनदलितांचे शोषण करूण आपले पोट बिना कष्टाने कसे भरता येईल याची काळजी घेवून ह्या वर्ण व्यवस्थेची निर्मिती केली आहे. अशा प्रकारच्या गुलामगिरीच्या बेडा तोडल्या पाहीजे, असे स्पष्ट मत महात्मा ज्योतिबा फुले यांनी मांडले. त्यासाठी लोकांनपर्यत आपले विचार पोहचविण्यासाठी त्यांनी गुलामगिरी नावाचा ग्रंथ लिहून तथाकथित कर्मठसनातनी लोकांची तोडे बंद केली. ह्या परंपरांगत चालत रूढी प्रथा परंपरेला महात्मा ज्योतिबा फुले यांनी मुठमाती दिली होती. त्यांनी चालत आलेली गुलामगिरी तोडण्याच्या प्रयत्न केला.

निर्मात्याने सर्वच प्राणिमात्रांना जेव्हा निर्माण केले. तेव्हा मनुष्यास स्वतंत्र प्राणी म्हणून निर्माण केले आहे.त्याला आपल्या सर्वच हक्कांचा उपभोग घेण्यास समर्थ बनविले आहे.त्याला विचार करण्याची कल्पना शक्ती दिली आहे. परतु त्यांच्या बुद्धीवर आजच्या मनुवाद्यादी लोकांनी राज्य केले आहे. त्यामुळे त्यांच्या बुद्धीची गुलामगिरी नष्ट व्हायला पाहिजे. असे प्रतिपादन महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले.हा सर्व विचारांचा पगडा आहे. हे विचार बदलविल्या शिवाय पर्याय नाही. तर हे विचार बदलून चालत नाही तर ते विचार प्रत्यक्षात आचरण्यात आणल्याशिवाय त्याला अर्थही नाही "करणी आणि कथणी" एक असल्याशिवाय त्या आचार विचाराला अर्थ राहत नाही. असे स्पष्ट मतमहात्मा ज्योतिबा फुलेनी यांनी मांडले आहे. ह्या त्यांच्या क्रांतीकारी विचारामुळे बहुजन वर्गामध्ये मोठी खळबळ माजली. बहुजन वर्गामध्ये क्रांतीचे विचारांचे परीवर्तन व्हायला सुरवात झाली. ज्या व्यक्तीमध्ये कष्ट करण्याची धमक नसते. असेच लोक संन्यासी व भिक्षूक होतात. संसार खरा नाही. व्यर्थ

आहे. असा भ्रम लोकांच्या बुद्धीत निर्माण करूण आपले स्वतःचे उत्पन्त्र वाढवितात. असे करण्यात त्यांचा आळशी–धूर्तपणाच दिसून असतो. ईश्वराने शुद्रातिशुद्रास व इतर लोकास आपण केलेल्या सृष्टीतील वस्तुंच्या सारख्या रीतीने उपभोग घेण्याची मोकळीक दिली असून भट ब्राम्हण लोकांनी त्यांच्या नावाचे अनेक खोटे ग्रंथ लिहून त्यामध्ये सर्वाचे हक्क रद्द करून स्वतःला मानाचे व सनमानाचे स्थान दिले. पणदिनदलितांना निम्न स्थान दिले. त्यामुळे ते अग्रगण्य होवून बसले आहे.पण सर्वसामान्य वर्गाची धर्माच्या नावखाली लुबाडणूक करून सर्वसामान्य जनतेचे मोठ्या प्रमाणात शोषण केले. त्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले उदाहरण देतात की, केस कापणे, हा नाव्ही लोकांचा धर्म नाही. तर हा त्यांचा परंपरांगत चालत आलेला धंदा आहे. चामड्याची शिलाई करणे, हा हा चांभराचा धर्म नाही. हा सुद्धा परंपरागत चालत आलेला त्यांचा धंदा आहे.त्याप्रकारे पुजापाठ करणे, हा ब्राम्हणांचा धर्म नाही तर हा त्यांचा परंपरांगत चालत आलेला धंदा आहे. ह्या आपल्या धंदयावर कोणी डला मारू नये, म्हणून धर्माचा बडेजाव करूण सर्वसामान्य मानसाला फसविण्याचा त्यांचा मोठा डाव आहे. असे स्पष्ट मत महात्मा ज्योतिबा फुले यांनी मांडले.

मंदिरातील देवी–देवता हा पुरोहितांचा व ब्राम्हणाचा पाखंड आहे.दुनिया बनविणारा एका दगडात किंवा विशिष्ट ठिकांणापर्यत मर्यादित कसा राहू शकतो.? ज्या दगडयाने रस्ते, घरे इत्यादी बनविले जातात. त्याच दगडात देव कसा असू शकतो? असा खडा सवाल महात्मा ज्योतिबा फुले यानी ब्राम्हणवाद्यांना केला होता. जर दगडात मंत्राद्वारे देव येऊ शकतो. तर मग मंत्रशक्तीद्वारे वा मंत्राद्वारे मेलेला माणुस का जीवंत केला जाऊ शकत नाही.असा खडा सवाल कर्मठ लोकांना केला. जर सर्वांना बनविणारा एक आहे. आणि त्याने सर्व काही सर्वासाठी बनविले आहे, तर मग धर्म अनेक कसे राहू शकतात. जातीप्रथा हा धर्म नाही आहे. ही ब्राम्हणांची इतर लोकांना निच मानण्याची प्रवृत्ती आहे. आपले समाजातील स्थान हे कायम व श्रेष्ठ राहण्यासाठी त्याचा हा दृष्ट कयास आहे. एखाद्या व्यक्तीने उदरनिर्वाह करण्यासाठी केले जाणारे काम हा त्यांचाच धंदा आहे धर्म नाही. कोणत्याही व्यक्तीला सामाजिक सतानता, राजनैतिक भागीदारी, धार्मिक व आर्थिक स्वतंत्र्यता आणि शिक्षणापासून वंचित करणे आणि त्यांचा शारीरिक व मानसिक रुपाने धर्माच्या नावाखाली शोषण करणे किंवा शोषणाला धर्म मानणे ही क्रृरता व निर्दयता आहे. धर्म तो आहे समाजाच्या हितासाठी समाजाच्या कल्याणासाठी आहे.जो धर्म समाज हितासाठी नाही, तो धर्म नाही. या भुतलावरचे सर्व प्राणीमात्र हे जन्मतःच स्वतंत्र व सर्वसमान आहे. तो पुरुष असो की स्त्री. हे समान आहे. भेदभाव व जातीव्यवस्था ही मनुनिर्मित वा मानवनिर्मित आहे. असे स्पष्ट प्रतिपादन महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले. म्हणूनच त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा भेदभाव करणे मानवता आणि नैतिकतेच्या विरूद्ध आहे. असे मत महात्मा ज्योतिबा फुले यांनी मांडले होते.

स्वातंत्र आणि समान संधी ही मानवाची आवश्यक गरज आहे. स्वात़ंत्रयाशिवाय कोणत्याही व्यक्तीमत्वाचा संपूर्ण विकास होऊच शकत नाही. मानवता हा धर्म सर्वात श्रेष्ठ आहे. जात पात वर्णभेद, उच–नीच या भिंती ब्राम्हण वर्गानी निर्माण केल्या आहे. ही त्यांची

ब्राम्हणांची देण आहे, ज्या त्यांनी स्वतःच्या स्वार्थासाठी उभारल्या आहेत. वेगवेग्ळया प्रकारचे कर्मकांड,धार्मिक विधी अनुष्ठान भोळया भाबडया जनतेला लुटण्यासाठी निर्माण केले आहे. ब्राम्हणवादी आपल्या तिरस्करणीय विचारामुळे गवत खाणा—या गायीचे मुत्र पिऊन पवित्र होतात.परंतु एका शुद्र व्यक्तीच्या हातचे साफ, स्वच्छ, निर्मळ पाणी पीत नाही. समाजात असलेली धार्मिक कट्टरता आणि अंधविश्वास सामाजिक एकता आणि बंधूता यामध्ये असलेली सर्वात मोठी अडचण आहे. आर्थिक विषमता शेतक—यांच्या कष्टाला आणि दुःखाला कारणीभुत आहे. कोणीही कोणाचा धर्माचा हेवा करू नये. देव एक आहे, आणि सर्व माणसे ही त्याची मुले आहेत .दुसऱ्या व्यक्तीचे हक्क कधीच हिरावून घेवू नका. ज्योपर्यत अन्न आणि वैवाहिक संबंधावर जातीय संबंध कायम राहतील तोपर्यत राष्टवादाची भावना विकसित होणार नाही. देव आणि भक्त यांच्यामध्ये मध्यस्थाची गरज नाही. सत्य पालन हाच एक धर्म आहे. बाकीचे सर्व अधर्म आहे. मांत्रिकांच्या नादी लागू नका, सर्व औषधोपचार करा मानवासाठी अनेक धर्म अस्तित्वात आले आहे. पण धर्म सगळया मानवासाठी का निर्माण झाला नाही? असा सवाल महात्मा ज्योतिबा फुले यानी मनुवाद्यांना केला आहे.

मासा पाण्यात खेळतो पोहतो त्याला गुरूची आवश्यकता नसते. निती हाच मानवी जिवनाचा आधार आहे. निर्मात्याने सर्व स्त्री—पुरुषांस धार्मिक व राजकिय स्वतंत्र्यंता दिली आहे. एकदंर सर्वानाच मानवी अधिकाराचे मुख्य धनी केले आहे. त्यातुन एखादा मानव अथवा काही मानवाची टोळी एखाद्या व्यक्तीवर जबरी करू शकत नाही. त्याचप्रमाणे जबरी न करणऱ्यांना सत्यवर्तन करणारे म्हणावे लागतील. स्त्री किंवा पुरुष एकदंर सर्व गावाचे प्रातांचे, देशाचे,खेडांच्या संबंधात आणि कोणत्याही धर्मातील स्वतःच्या संबंधांत, स्त्री किंवा पुरुष अथवा एकमेकांत एकमेकांनी कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता या भूखंडावर आपले एक कुटूंब समजून एकमताने सत्यवर्तन करून रहावे स्त्री अथवा पुरुष, शेतकरी किंवा कलाकौशल्य करून पोट भरण्याला श्रेष्ठ मानतात, शेतकरी यांना मदत करणाऱ्यांचा आदरसत्कार करतात. त्यांना सत्यवर्तन करणारे म्हणावे. समाजाच्या विकासासाठी हे आवश्यक आहे की, समाजाची एकता अशी असावी की, त्या समाजाच्या सर्व लोकांना स्वातंत्र आणि समानतेचे सर्व अधिकार मिळावे आणि त्यांच्यामध्ये बंधुता असावी. जाती—धर्माचे जाळे अन्याय आणि शोषणाची प्रक्रिया चालू ठेवण्यासाठी फैलवले गेले आहेत. अशाप्रकारची जातिव्यवस्था नष्ट व्हायला पाहिजे आणि नवनिर्माण समाजाची निर्मिती व्हायला पाहिजे असे स्वप्न महात्मा ज्योतिबा फुले पहतांना दिसतात.

**निष्कर्ष : —**

आज त्यांच्या शिक्षणाच्या माध्यमातून समाजात क्रांतीचे वारे वाहु लागले आहे. समाजात एकता निर्माण होऊन क्रांतीकारी बदल व्हायला सुरवात झाली आहे. समाजात चेतना निर्माण होऊन प्रत्येक माणुस स्वतःच्या हक्कासाठी लढतांना दिसून येतो.आज भारतातील दिनदलित समाज जागृत झाला आहे. तो शिकायला लागला असून, प्रशासकिय नोकरीमध्ये दाखल झाला आहे. त्यांच्या विचारामध्ये बदल होऊन आधुनिक विचारसरणी

त्यांनी स्विकारली आहे. सनातनी विचाराला आता मुठमाती दिली जात आहे. मंत्रतंत्र ,कर्मकांड, सोवळे आवेळे याच्या जंजाळयात न पडता आपला विकास कसा होईल याकडे त्यांनी लक्ष द्यायला सुरवात केली आहे. ही क्रांती महात्मा ज्योतिबा फुले यांनी पेटविलेल्या मशालीतूनच झाली आहे. आज उच्च वर्गीयानां नोकऱ्यामध्ये स्पर्धा करणारा बहुजन वर्गच आहे. आज सर्वच स्तरावर सर्वसामान्य वर्ग नोकरी करीत असल्याचे आपल्याला दिसत आहे. हेच महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रयत्नाचे यश म्हणावे लागेल. आपर्यत अशाप्रकारच्या नेता झाला नाही व पुढे सुद्धा होणार नाही. म्हणून त्यांच्या बाबत म्हणावे लागते की ''मरावे परी किर्तीरुपे राहवे'' ही म्हण या ठिकांणी योग लागते. त्यांनी केलेले कार्य हे इतिहासात आजही अजराअमर झालेले आहे. त्यांच्या क्रांतीकारी विचाराची ज्योत ही सतत पेटत राहणारी आहे .तसेच त्यांच्या विचारांचे मुल्य हे चिंरतन टिकणारे आहे.

**संदर्भ ग्रंथसुची : –**


- गुलामगिरी – जोतिराव गोविंदराव फुले, प्रकाशक , पुना सिटी प्रेस, वर्षे ,1873
- सार्वजनिक सत्यधर्म – जोतिराव गोविंदराव फुले, संपादक यंशवंत जोतीराव फुले, सुबोध प्रकाशक, मुंबई वर्षे ,1891
- ब्राम्हणाचे कसब – जोति गोविंदराव फुले, इंदु प्रकाशन , मुंबई, वर्षे ,1869
- शेकऱ्याचा आसुड – जोतिराव गोविंदराव फुले, प्रकाशन ,पुणे वर्षे ,1886
- समग्र वाङ्मय महात्मा फुले–संपादक :डॉ.प्रतिभा अहिरे, साद प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती वर्षे ,2013
- धनंजय कीर – महात्मा ज्योतिराव फुले, पाप्युलर प्रकाशन मुंबई वर्षे चौथी आवृत्ती,1992
- डॉ. सरोज आगलावे– ज्योतिराव फुले सामाजिक फुले तत्वज्ञान,सुगावा प्रकाशन पुणे 2003
- ग.बा.सरदार,तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,धनंजय कीर, प्रा.डॉ.ज.रा.शिंदे महात्मा फुले :प्रेरणा व तत्वज्ञान, महात्मा फुले प्रतिष्ठाण व प्रकाशन, मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद 1990
- पी.बी. सांळुखे, डॉ.एम.जी.माळी,ग.प्र.प्रधान, एन.डी.पाटील व बॅ.पी.जी.पाटील (संपादीत), महात्मा फुले गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई ( आवृत्ती जुलै 1982)
- धनंजय कीर, डॉ.श.ग.मालशेव डॉ.य.दि.फडके (संपादीत), महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई (सहावी आवृत्ती, 2006),